N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन वेषणफॉर्म - १)

FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)

प्रथम खबर अहवाल

(बी एन एस एस संहिताच्या कलम 173 अन्वये)

1. District (जिल्हा): कोल्हापुर P.S. (पोलीस ठाणे): करवीर Year (वर्ष): 2026

FIR No. (प्रथम खबर क्र.): 0130 Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ): 06/03/2026 02:52 वाजता

2.

S.No. (अ.क्र.)	Acts (अधिनियम)	Sections (कलम)
1	भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८	7
2	भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८	7A

3. (a) Occurrence of offence(गुन्ह्याची घटना):

1 Day (दिवस): मधले दिवस Date from (दिनांक पासून): 04/03/2026 Date To (दिनांक पर्यंत): 05/03/2026

Time Period (कालावधी): Time From (वेळेपासून): 14:49 तास Time To (वेळेपर्यंत): 14:02 तास

(b) Information received at P.S. (पोलीस ठाण्यावर माहिती मिळाल्याचा): Date (दिनांक): 06/03/2026 Time (वेळ): 02:39 तास

(c) General Diary Reference (ठाणे दैनंदिनी संदर्भ): Entry No. (नोंद क्र.): 002 Date and Time (दिनांक आणि वेळ): 06/03/2026 02:39 तास

4. Type of Information (माहितीचा प्रकार): लेखी

5. Place of Occurrence (घटनास्थळ):

1. (a) Direction and distance from P.S. (पोलिस ठाण्या पासून दिशा आणि अंतर): उत्तर, 12 कि.मी. Beat No. (बीट क्र.):

(b) Address (पत्ता): तलाठी सजा कार्यालय, शिंगणापूर ताकरवीर जिकोल्हापू,

(c) In case, outside the limit of this Police Station, then Name of P.S. (पोलीस ठाण्याच्या हद्दी बाहेर असल्यास, पोलीस ठाण्याचे नाव):

District (State) (जिल्हा (राज्य)):

6. Complainant / Informant (तक्रारदार / माहिती देणारा):

(a) Name (नाव): योगेश रघुनाथ कुंभार

(b) Father's/Husband's Name (वडिलांचे/पतीचे नाव):

(c) Date/Year of Birth (जन्मतारीख / वर्ष): 1992

(d) Nationality (राष्ट्रीयत्व):भारत

(e) UID No. (यु.आय.डी. क्र.):

(f) Passport No. (पारपत्र क्र.):

Date of Issue (दिल्याची तारीख): Place of Issue (दिल्याचे ठिकाण):

(g) ID Details (Ration Card, Voter ID Card, Passport, UID No., Driving License, PAN) (ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पैन कार्ड))

S. No. (अ.क्र.)	ID Type (ओळखपत्राचा प्रकार)	ID Number (ओळखपत्र क्रमांक)

(h) Occupation (व्यवसाय):

(i) Address (पत्ता):

S.No. (अ.क्र.)	Address Type (पत्ता प्रकार)	Address (पत्ता)::
1	वर्तमान पता	19/464, विश्वकर्मा नगर कोल्हापूर नाका, इचलकरंजी ताहातकणंगले , जि कोल्हापुर, करवीर, कोल्हापुर, महाराष्ट्र, भारत
2	स्थायी पता	19/464, विश्वकर्मा नगर कोल्हापूर नाका, इचलकरंजी ताहातकणंगले , जि कोल्हापुर, करवीर, कोल्हापुर, महाराष्ट्र, भारत

(j) Phone number (फोन नं.): Mobile (मोबाइल क्र.): 91-8446137171

I.I.F.-I (एकीकृत अन्न वेषणफॉर्म - १)

Details of known / suspected / unknown accused with full particulars (ज्ञात / संशयित / अज्ञात आरोपींचे संपूर्ण तपशील):

Accused More Than (अज्ञात आरोपी एका पेक्षा जास्त असतील तर संख्या): 0

S. No. (अ.क्र.)	Name (नाव)	Alias (उर्फनाव)	Relative's Name (नातेवाईकाचे नाव)	Present Address(वर्तमान (पत्ता))
1	इरफान दिलावर सनदी			1. Town/Village (शहर / गाव): शिंगणापूर ताकरवीर,Tehsil (तहसील): जि कोल्हापूर,Police Station (पोलीस ठाणे): करवीर,District (जिल्हा): कोल्हापुर,State (राज्य): महाराष्ट्र,भारत
2	दिपक सदाशिव कांबळे			1. Town/Village (शहर / गाव): शिंगणापूर ग्रामपंचायत,Tehsil (तहसील): ताकरवीर जिकोल्हापूर,Police Station (पोलीस ठाणे): करवीर,District (जिल्हा): कोल्हापुर,State (राज्य): महाराष्ट्र,भारत

8. Reasons for delay in reporting by the complainant / informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

S. No. (अ.क्र.)	Propertty Category (मालमत्ता वर्ग)	Property Type (मालमत्ता प्रकार)	Description (विवरण)	Value(In Rs/-) मुल्य (रु. मध्ये)
1	नाणे आणि चलन	भारतीय- रुपया	तडजोडीअंती स्विकारलेली रक्कम 5,000/ रूपये त्यामध्ये 500 रु दराच्या 10 भारतीय चलनी नोटा	5,000.00

10. Total value of property (In Rs/-) मालमत्तेचे एकूण मुल्य (रु. मध्ये) : 5,000.00

11. **Inquest Report / U.D. case No., if any (मरणान्वेषण अहवाल/अकस्मात मृत्यू प्रकरण क्र. जर असल्यास):**

S. No. (अ.क्र.)	UIDB Number (यु.आय.डी.बी.)

12. **First Information contents (प्रथम खबर हकिगत):**

फिर्याद दिनांक - 06/03/2026

मी.उज्वला मारुती भडकमकर वय-38 वर्षे, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, कोल्हापूर मो.नं. 8446153029 समक्ष करवीर पोलीस ठाणे जि.कोल्हापूर येथे हजर राहुन फिर्याद देते की,

दिनांक 04/03/2026 रोजी मला पोलीस उपअधीक्षक वैष्णवी पाटील यांनी ॲन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर कार्यालयात बोलावुन घेवुन कळविले की, तक्रारदार योगेश रघुनाथ कुभांर, वय - 34 वर्षे, व्यवसाय - वेल्डींग वर्कशॉप, रा. 19/464, विश्वकर्मा नगर, कोल्हापूर नाका, इचलकरंजी, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर मो.नं. 8446137171 यांची ओळख करुन देवून त्यांचेकडे सजा कार्यालय, षिंगणापूर येथील तलाठी ईरफान सनदी हे तक्रारदार यांचे वडीलांनी खरेदी केलेल्या जागेची 7/12 पत्रकी वडीलांचे नावाची नोंद करणेकरीता लाच मागणी करत असल्याबाबत तक्रार असल्याचे संागून पुढील कारवाई करणेसाठी पंच उपलब्ध करुन घेणेस व पुढील कारवाई करणेबाबतचा आम्हास मुखशील आदेश दिला. त्यावेळी आम्ही तक्रारदार कुंभार यांना आमचे कक्षात बोलावून घेवून त्यांना त्यांची तक्रार विचारली असता,त्यांनी थोडक्यात तक्रार सांगितली की, मी वरील ठिकाणी राहणेस असून माझे वेल्डींग शॉप आहे. माझे वडील रघुनाथ बंडु कंुभार यांनी मौजे शिंगणापूर , ता. करवीर येथील गट नंबर 73/48/प्लॉट नं./ए/12 व गट नंबर 73/48/प्लॉट नं./ए/11 मधील एकुण 230.10 चै.मी.क्षेत्राचा खुला प्लॉट आणि या प्लॉट वरील बांधण्यात आलेल्या रो बंगला राजेश पांडुरंग कुंभार,रा. ई वार्ड कोल्हापूर यांच्याकडुन दिनांक 22/04/2024 रोजी खरेदी केलेला होता. त्याबाबत आम्ही ग्रामपंचायत शिंगणापूर येथे नोंद केली आहे. त्यानंतर आम्ही मौजे शिंगणापूर , ता. करवीर येथील गट नंबर 73/48/प्लॉट नं./ए/12 व गट नंबर 73/48/प्लॉट नं./ए/11 मधील सातबारा पत्रकी राजेश पांडुरंग कुंभार यांचे नाव कमी करून माझे वडील रघुनाथ बंडु कंुभार यांचे नाव नोंद करणेसाठी दिनांक 25/04/2025 रोजी रितसर अर्ज केला होता. माझे वडील वयोवृध्द असल्याने मी स्वतः सदर कामाचा पाठपुरावा तलाठी कार्यालय शिंगणापूर येथे जावुन करीत आहे. एप्रिल 2025 पासुन मी अधुन मधुन तलाठी कार्यालयात जावुन माझे कामाबाबत माहिती घेत होतो. दिनांक 19/01/2026 रोजी मी माझे वरील कामाबाबत तलाठी कार्यालय शिंगणापूर येथे गेलो होतो. त्यावेळी तेथे माझी भेट तलाठी सनदी यांचेशी झाली मी त्यांना आम्ही वरील खरेदी केले जमीनीचे सात बारा पत्रकी वडीलांचे नाव लावणेसाठी सुमारे 10 महिन्यापुर्वी अर्ज दिला असुन अजुन वडीलांचे नावाची नोंद झालेली नाही असे सांगुन त्यांना खरेदी दस्त व संबधीत कागदपत्रे दाखविली. त्यावेळी त्यांनी माझेकडील कागदपत्रे पाहुन मला कार्यालयाचे बाजुला घेवुन गेले. त्यावेळी तलाठी सनदे यांनी मला आमचे अर्जाप्रमाणे सातबारा पत्रकी माझे वडीलांचे नाव लावुन देतो त्याकरीता 10,000/- रूपये दया लगेच नाव लावुन देतो असे म्हणाले. त्यावेळी मी त्यांना माझा वेल्डींगचा व्यवसाय असुन

माझेकडे आता ऐवढे पैसे नाहीत काहीतरी कमी करा असे म्हणालो त्यावेळी त्यांनी पैसे कमी करण्यास नकार दिला. त्यावेळी मी त्यांना पैशाची जुळणा झाली की तुम्हाला येवुन भेटतो असे सांगुन निघुन आलो होतो.सजा शिंगणापूर, ता.करवीर, जि.कोल्हापूर येथीले तलाठी सनदी हे माझे वडीलांनी खरेदी केलेल्या जागेची 7/12 पत्रकावर वडीलांचे नावाची नोंद करणेकरीता माझेकडे मागणी करीत असलेले 10,000/- रूपये रक्कम ही लाच म्हणुन मागणी करीत असलेची माझी खात्री झाली आहे. परंतु मला त्यांना लाच रक्कम देणेची इच्छा नाही. तरी त्यांचेवर कारवाई करावी म्हणुन तक्रार सांगुन, मी दिनांक 04/03/2026 रोजी दुपारी 14.30 वा चे सुमारास तलाठी सनदी यांना त्यांचे तलाठी कार्यालय शिंगणापूर येथे भेटणेस जाणार असुन त्यांचेवर आपणाकडुन कारवाई व्हावी ही विनंती. त्यावेळी तक्रारदार यांनी आम्हास ते गणेष मंदीर षिंगणापूर, कोल्हापूर जवळ मोकळया जागेत येथे भेटतो असे सांगितले. त्यावेळी आम्ही तक्रारदार कुंभार यांना त्यांनी सांगितले ठिकाणी 14.00 वा चे सुमारास पोहचत असल्याचे सांगुन, तेथे त्यांना हजर राहणेस सांगितले. त्यानंतर मी लागलीच मा.अधीक्षक अभियंता,मृद व जलसंधारण विभाग कोल्हापूर यांचे कार्यालयातुन लेखी रिपोर्टने दोन शासकीय पंच यांना दिनांक 04/03/2026 रोजी तात्काळ गोपनिय कामकाजाकरीता पाठवावे असे कळविले. दिनांक 04/03/2026 रोजी दुपारी 13.30 वा चे सुमारास दोन शासकीय पंच 01) सत्यजीत संजय मंडले कनिष्ठ लिपीक, 02) हर्षल मंगेष धुमाळ कनिष्ठ लिपीक असे हजर झाले. त्यानंतर आम्ही, सापळा पथकातील अंमलदार, शासकीय दोन्ही पंच असे सापळा कारवाई करीता आवश्यक असलेली सामुग्री घेवुन,कार्यालयातील अमंलदार पो.हे.काॅ.संदिप काशीद, पो.ना.सचिन पाटील, पो.काॅ.कृष्णा पाटील, पोकाॅ/संदिप पवार असे शासकीय वाहनातुन कोल्हापूर ते पापाची तिकटी ते षिंगणापूर नाका ते षिंगणापूर येथील सिध्द बटुकेष्वर गणेष मंदीराचे पाठीमागील बाजूस असले झाडाजवळ रिकाम्या जागी आलो. त्यावेळी तेथे तक्रारदार उपस्थित होते. त्यावेळी मी तक्रारदार कुंभार यांना स्टाफ, शासकीय पंच यांचेशी ओळख करून दिली. त्यानंतर माझे सुचनेवरून तक्रारदार कुंभार यांनी वरीलप्रमाणे त्यांची तक्रार पंचाना सांगितली. त्यानंतर तक्रारदार कुंभार यांनी आमचेकडे दिलेला तक्रारी अर्ज पंचाना वाचणेस दिला. तक्रारदार कुंभार यांनी सांगितलेली व लेखी तक्रार एकच असल्याची खात्री झालेनंतर मी, व दोन्ही पंचानी तक्रारी अर्जावर सहया केल्या. तक्रारीच्या अनुषंगाने तक्रारदार कुंभार व पंच नं.01 सत्यजीत मंडले यांचेसह तलाठी कार्यालय षिंगणापूर येथे ईरफान सनदी यांची भेट घेणेकरीता पाठवुन, कुंभार यांचे तक्रारीप्रमाणे, त्यांचेकडे ईरफान सनदी हे लाचेची मागणी करतात अगर कसे? याची आपण प्रथम पडताळणी करणार आहोत असे सांगुन, पडताळणी कारवाईचे अनुषंगाने मी संपुर्ण सुचना दिल्या. शासकीय डिजीटल व्हाॅईस रेकाॅर्डर काढून त्यामध्ये झक्ड कंपनीचे 8 जीबीचे मायक्रो एसडीएचसी कार्ड (मेमरी कार्ड) पंचाचे समक्ष घालून, रेकाॅर्डरचे फोल्डर मध्ये यापुर्वीचे कोणतेही ध्वनिमुद्रीत संभाषण नसलेची तक्रारदार कुंभार व पंचाची खात्री करून दिली. डिजीटल व्हाॅईस रेकाॅर्डर चालू बंद करण्याचे प्रात्यक्षीक दाखविले. त्यानंतर पडताळणी कारवाईचे अनुषंगाने तक्रारदार कुंभार व दोन्ही पंचाची निवेदने घेतली. त्यानंतर पडताळणी कारवाईचे अनुषंगाने व्हाईस रेकाॅर्डर 14.49 वाजता चालु करून, तो तक्रारदार कुंभार यांचे गळयात काळया दो-याच्या साहयाने अडकवुन, तक्रारदार कुंभार व पंच नं.1 सत्यजीत मंडले यांना ईरफान सनदी यांची भेट घेण्याकरीता तक्रारदार कुंभार यांचे यामाहा मोपेड सायकल क्रमांक एमएच 51 डी.7277 वरून पाठविले. त्यावेळी आम्ही सापळा पथक व पंच नं.02 हर्षल धुमाळ असे सदर ठिकाणी थांबुन

राहीलो. तक्रारदार कुंभार व पंच नं.1 सत्यजीत मंडले असे ईरफान सनदी यांना भेटुन आम्ही थांबलेल्या ठिकाणी परत आले. त्यावेळी व्हाईस रेकॉर्डर 16.14 वाजता बंद केला.

त्यावेळी आम्ही प्रथम पंच नं.1 मंडले यांना आमचेजवळ बोलावुन घेवून त्यांना, तुम्ही तक्रारदार यांचेसोबत तलाठी कार्यालय शिंगणापूर तलाठी सनदी यांना भेटणेस गेलेनंतर तेथे काय घडले याबाबत विचारणा केली, त्यावेळी पंच मंडले हे आम्हास हकिकत सांगत असताना तक्रारदार यांचे मोबाईल नंबर 8446137171 यावर तलाठी सनदी यांनी त्यांचे मोबाईल नंबर 7760536365 वरुन फोन येत असल्याचे तक्रारदार यांनी आम्हास सांगितले. त्यावेळी आम्ही सदरचा कॉल डिजिटल व्हाईस रेकॉर्डर मध्ये रेकॉर्ड करण्याचे ठरविले. डिजिटल व्हाईस रेकॉर्डर सुरू करेपर्यंत सदरचा कॉल कट झाला, त्यावेळी आमचे सुचनेप्रमाणे तक्रारदार यांना त्यांचा फोन स्पीकर मोडवर ठेवून तलाठी सनदी यांच्या मोबाईल फोनवर फोन करण्यास सांगितले, परंतू तलाठी सनदी यांचा फोन बिझी असल्याने फोन लागला नाही. थोडयावेळात तलाठी सनदी यांचा पुन्हा तक्रारदार यांच्या मोबाईलवर फोन आला त्यावेळी आमचे सुचनेप्रमाणे सदरचा फोन तक्रारदार यांनी फोन स्पीकर मोडवर ठेवून रिसिव्ह केला, त्यावेळी तक्रारदार 'हॅलो...' असे म्हणाले, त्यावर तलाठी सनदी हे 'हॅलो... कुंठ आहे तुम्ही...' अशी विचारणा केली, त्यावर तक्रारदार 'मी आता चाललोय इकड कोल्हापूर साईडला असे म्हणाले त्यावर तलाठी'ओके..ओके कुठ कोल्हापूर साईडला चाललाय काय, असे म्हणाले त्यावर तक्रारदार होय असे म्हणाले त्यावर तलाठी सनदी हे,नेमका पॉईंट कुठ हाय तुमचा असे म्हणाले त्यावर तक्रारदार रंकाळा साईडला असे म्हणाले त्यावर तलाठी सनदी हे ओके थांबा तिथे रंकाळयाजवळ असे म्हणाले त्यावेळी तक्रारदार हे पैशाची जुळणी करतो असे बोलले असता तलाठी यांनी ते काय नको असे बोलून फोन कट केला....त्यावेळी तलाठी सनदी यांनी तक्रारदार यांना भेटण्यासाठी रंकाळा जवळ थांबण्यास सांगितले.

त्यानंतर वेळेअभावी पडताळणी कारवाईवेळी ध्वनीमुद्रीत झालेले मेमरी कार्डमधील संभाषण सुरक्षीत जतन करण्याच्या उद्देशाने पडताळणी कारवाईवेळी वापरलेले मेमरी कार्ड हे पंचासमक्ष डिजिटल व्हाईस रेकॉर्डरमधून काढून एका प्लॅस्टिकचे पॉकेटमध्ये सुरक्षित ठेवुन ताब्यात घेतले. नमूद मेमरी कार्डमधील ध्वनिमुद्रीत झालेले संभाषण हे तक्रारदार हे तलाठी सनदी यांना रंकाळयाजवळ भेटून आल्यानंतर तक्रारदार व पंच यांच्या समक्ष ऐकण्याचे ठरविले. त्यानंतर तक्रारदार कुंभार यांना तलाठी सनदी हे रंकाळयाजवळ भेटण्यास येणार असल्याने त्यांच्यातील होणारे संभाषण ध्वनिमुद्रीत करण्याकरीता आमचेकडील शासकीय डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर काढून त्यामध्ये ज़क्ड कंपनीचे 8 जीबीचे मायक्रो एसडीएचसी कार्ड (मेमरी कार्ड) पंचाचे समक्ष घालून,रेकॉर्डरचे फोल्डर मध्ये यापुर्वीचे कोणतेही ध्वनिमुद्रीत संभाषण नसलेची तक्रारदार कुंभार व पंचाची खात्री करून दिली.

त्यानंतर पडताळणी कारवाईचे अनुषंगाने व्हाईस रेकॉर्डर 16.30 वाजता चालु करून, तो तक्रारदार कुंभार यांचे गळयात काळया दो-याच्या साहयाने अडकवुन, तक्रारदार कुंभार व पंच नं.1 सत्यजीत मंडले यांना ईरफान सनदी यांची भेट घेण्याकरीता तक्रारदार कुंभार यांचे यामाहा मोपेड सायकल क्रमांक एमएच 51 डी.7277 वरून पाठविले. त्यावेळी आम्ही सापळा पथक व पंच नं.02 हर्षल धुमाळ सदर ठिकाणी थांबुन राहीलो. तक्रारदार कुंभार व पंच नं.1 सत्यजीत मंडले असे ईरफान सनदी यांना भेटुन आम्ही थांबलेल्या ठिकाणी परत आले. त्यावेळी व्हाईस रेकॉर्डर 17.06 वाजता बंद केला.

त्यावेळी आम्ही प्रथम पंच नं.1 मंडले यांना आमचेजवळ बोलावुन घेवून त्यांना, तुम्ही तक्रारदार यांचेसोबत तलाठी सनदी यांनी बोलविल्या ठिकाणी रंकाळा तलाव येथे तलाठी सनदी यांना भेटणेस गेलेवर काय घटना घडली याबाबत विचारणा करता त्यावेळी पंच नं.01 यांनी सांगितले की, तक्रारदार व मी तक्रारदार यांच्या मोपेडवरून आपण थांबलेल्या ठिकाणावरून रंकाळया कोल्हापूर -गगनबावडा रोडला असले पेट्रोलपंपाजवळ पोहोचलो, त्यावेळी तक्रारदार यांच्या मोबाईल फोनवर तलाठी सनदी यांचा फोन आला, त्यावेळी तक्रारदार व तलाठी सनदी यांच्यामध्ये बोलणे झाले, त्यावेळी तक्रारदार यांनी रंकाळयाजवळी पेट्रोलपंपाजवळ थांबलो असल्याचे सांगितले, त्यावेळी तलाठी सनदी यांनी ते बीटी कॉलेज, केडीसी बॅक, शाहुपुरी येथे आलो असल्याचे सांगून तक्रारदार यांनी तेथे येतो असे सांगून फोन कट केला. त्यानंतर तक्रारदार व मी असे केडीसी बॅक, शाहुपुरी समोरील बीटी कॉलेज जवळ पोहोचलो. त्यावेळी तक्रारदार यांनी मोपेड बीटी कॉलेजचे पार्किंगमध्ये पार्क केली व तक्रारदार यांनी तलाठी सनदी यांचे मोबाईल फोनवर फोन केला परंतू त्यांनी फोन रिसिव्ह केला नाही. तेवढयात तलाठी सनदी हे आम्ही थांबलेल्या ठिकाणी आले. त्यावेळी तक्रारदार व तलाठी सनदी यांच्यामध्ये तक्रारदार यांच्या कामाबाबत बोलणे झाले, त्यावेळी तक्रारदार यांनी 'चालतयं त्यांनी सांगितलेली अमाऊंट घेवून येवू ना...' असे म्हणाले, त्यावर तलाठी सनदी ' राहु दे काय अडचण नाय...' असे म्हणाले, त्यावर तक्रारदार ' मी काय ॲडजेस्टमेंट करून येणार म्हणून म्हटलं...' असे म्हणाले, त्यावर तलाठी सनदी ' ठिक हाय...' असे म्हणाले, त्यावेळी तक्रारदार यांनी तलाठी सनदी यांना तुम्ही आता परत कधी भेटणार, उदया सकाळी येवू मग असे म्हणाले, त्यावेळी तलाठी सनदी यांनी तक्रारदार यांना 'या की उदया... आॅफिस टायमिंगला या...' असे सांगितले. त्यानंतर मी व तक्रारदार असे आपण थांबलेल्या ठिकाणी परत आलेबाबत संागितले.त्यानंतर तक्रारदार कुंभार यांना बोलावून घेवून पंच नं.01 सत्यजीत मंडले यांच्या सोबत गेल्यावर तेथे काय हकिकत घडली, तलाठी सनदी व तुमची भेट झाली काय, याबाबत विचारणा करता, तक्रारदार यांनी पंच नं01 मंडले यांच्याप्रमाणे मिळतीजुळती हकिकत सांगितली.

त्यानंतर आम्ही पंच नं.1 सत्यजीत मंडले यांना पडताळणी कारवाईवेळी तक्रारदार यांचेसोबत तलाठी कार्यालय, षिंगणापूर येथे तलाठी सनदी यांची भेट घेण्याकरीता गेले त्यावेळी तलाठी सनदी व तक्रारदार यांची भेट झाली का? त्यांच्यामध्ये काय संभाषण झाले याबाबत विचारणा करता, पंच नं.01 यांनी सांगितले की, मी व तक्रारदार असे तलाठी कार्यालय शिंगणापूर येथे गेलो, त्यावेळी तलाठी कार्यालयातील अनोळखी इसम तक्रारदार यांना ' बसा बाहेर ...' असे म्हणाले, त्यावर तक्रारदार ' आहेत नव्हं साहेब...' असे म्हणाले, त्यावर अनोळखी इसम ' साहेबांनी बोलेलं...' असे म्हणाले, त्यावर तक्रारदार ' तस दहा हजार सांगितलेलं मी बोलू का साहेबाशी काय ?...' असे म्हणाले, त्यावर अनोळखी इसम ' किती देणार मग...' असे म्हणाले, त्यावर तक्रारदार ' बोलू साहेबांशी डायरेक्ट, का निवांत बोलू...' असे म्हणाले, त्यावर अनोळखी इसम ' साहेबांनी मला सांगितलं...' असे म्हणाले, त्यावर तक्रारदार ' दहा सांगितलेलं...' असे म्हणाले, त्यावर अनोळखी इसम 'अं...' असे म्हणाले, त्यावर तक्रारदार ' डायरेक्ट बोलतो की कितीवर पर्यंत म्हणतोनी संपवूया इथं लगेचं, संपवून टाकायला सांगा. साहेब काय म्हणालेत त्यांनी दहा सांगितले ना त्यांनी साहेब काय म्हणतात दहा हजार सांगितलेलं ...' असे म्हणाले, त्यावर अनोळखी इसम 'आठ दे मग...' असे

म्हणाले, त्यावर तक्रारदार 'आठ हजार...' असे म्हणाले, त्यावर अनोळखी इसम 'हु...' असे म्हणाले, त्यावर तक्रारदार ' लय जास्त होत्यात ओ मी लय अडचणीत आहे ओ तुम्हाला काय सांगायचं. साहेबांना विचारून काय म्हणतात फायनल काय ...' असे म्हणाले, त्यावर अनोळखी इसम ' अरे काय अडग्यागत, मी तेन्ही सांगितलेलं सांगायला लागलोय तु आणि जा म्हणा...' असे म्हणाले, त्यावर तक्रारदार ' त्यांनी सांगितले आठ हजार म्हणून...' असे म्हणाले, त्यावर अनोळखी इसम 'दे ना मला तु...' असे म्हणाले, त्यावर तक्रारदार ' पाच हजार घेवून येवू ...' असे म्हणाले, त्यावर अनोळखी इसम ' मी म्हणतोय म्हणून सांगू माझ्या नावाणं आणि बोंबलाय नको तू आण तूला बसवून देतो. वाटलं तर नंतर हजार रूपये वाढवायचं हजार दोन हजार...' असे म्हणाले, त्यावर तक्रारदार ' तेवढं आता घेवून येतो...' असे म्हणाले. त्यानंतर तक्रारदार व मी आपण थांबलेल्या ठिकाणी परत आलो अषी हकिकत सांगितली. त्यानंतर आम्ही पंच नं.01 मंडले यांना बाजूला थांबणेस सांगून तक्रारदार कंुभार यांच्याकडे हकिकत विचारली असता तक्रारदार यांनी पंच नं.01 मंडले यांच्या हकिकतीप्रमाणे मिळतीजुळती हकिकत सांगून पंच नं.01 यांनी सांगितलेले अनोळखी इसम हे तलाठी कार्यालयात काम करणारे दिपक कांबळे असल्याचे आम्हांस सांगितले.

त्यानंतर पंच नं.1 सत्यजीत मंडले व तक्रारदार कुंभार यांचेकडुन हकीकत ऐकुण व्हाईस रेकाॅर्डमधील रेकाॅर्ड झालेले संभाषण तक्रारदार व पंच नं.01 मंडले यांचेसमक्ष संभाशण ऐकले असता, तक्रारदार कुंभार यांचेकडे त्यंाचे मौजे शिंगणापूर , ता. करवीर येथील गट नंबर 73/48/प्लाॅट नं./ए/12 व गट नंबर 73/48/प्लाॅट नं./ए/11 मधील सातबारा पत्रकी राजेश पांडुरंग कुंभार यांचे नाव कमी करून त्यांचे वडील रघुनाथ बंडु कंुभार यांचे नाव नोंदविण्याचे काम पुर्ण करण्यासाठी तलाठी ईरफान सनदी यांनी स्वतःकरीता तलाठी कार्यालयात काम करणारे दिपक कांबळे यांचेकरवी तक्रारदार यांच्याकडे 10,000/- रुपये लाचेची मागणी करून तडजोडीअंती 5,000/-रू लाच मागणी केली. सदर लाच रक्कम तलाठी सनदी यांनी उदया दिनांक 05/03/2026 रोजी आॅफिस वेळेमध्ये घेवुन येण्यास सांगितलेचे निष्पन्न झाले.

त्यानंतर पडताळणी कारवाई स्थगित करून सापळापुर्व व सापळा कारवाई उदईक दिनांक 05/03/2026 रोजी करण्याचे ठरवून पडताळणी कारवाईचे पुढील कामकाज ॲन्टी करप्शन ब्युरो कार्यालय, कोल्हापूर येथे 19.00 वा.ते 22.30 वा मुदतीत पुर्ण केली.

त्यानंतर आमचे सुचनेनुसार पोना/सचिन पाटील यांनी तक्रारदार कुंभार, तलाठी सनदी व कार्यालयातील दिपक कांबळे यांचेतील पडताळणी कारवाई दरम्यान डिजीटल व्हाॅईस रेकाॅर्डरवर ध्वनिमुद्रीत झालेले फोनवरील तसेच प्रत्यक्ष भेटीवेळीचे संभाषण पंचासमक्ष तक्रारदार यांचे मदतीने आवाज ओळखून व ऐकुण त्याच्या वेगवेगळया सविस्तर स्क्रिप्ट तयार केल्या आहेत. त्यानंतर सदर मेमरी कार्ड आम्ही जप्त करुन ताब्यात घेतले.

पडताळणी कारवाई दिले सुचनेप्रामणे आज दिनांक 05/03/2026 रोजी आम्ही ॲन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर कार्यालयात हजर असताना वरील नमुद दोन्ही पंच 10.00 वा. सुमारास कार्यालयात हजर झाले त्यानंतर आम्ही, सापळा पथकातील अंमलदार, शासकीय दोन्ही पंच असे सापळा कारवाई करीता आवश्यक असलेली सामुग्री घेवुन कार्यालयातील सापळा पथकातील अंमलदार असे शासकीय वाहनातुन कोल्हापूर ते पापाची तिकटी ते षिंगणापूर नाका ते षिंगणापूर येथील दि.04/03/2026 रोजीचे पडताळणी कारवाईवेळचे षिंगणापूर येथील सिध्द बटुकेष्वर गणेष मंदीराचे पाठीमागील बाजूस

असले झाडा जवळ आलो. त्यावेळी तेथे तक्रारदार उपस्थित होते.

. त्यानंतर आम्ही तक्रारदार, दोन्ही पंच व सापळा पथकास आपण सदर ठिकाणावरून सापळापुर्व व सापळा कारवाई आयोजित करण्याचे ठरविले. सापळा कारवाईचे अनुषंगाने आम्ही सर्वांना सर्व सुचना दिल्या. त्यानंतर मी तक्रारदार कुंभार यांना लाच रक्कम बाबत विचारणा केली, त्यावेळी तक्रारदार यांनी त्यांच्या बचतीमधील 500/- दराच्या 10 भारतीय चलनी नोटा अशी 5,000/- रूपये लाच रक्कम उपलब्ध केली. त्यानंतर मी तक्रारदार कुंभार व पंचाना ॲथ्रासिन पावडरचे गुणधर्म समजावुन, अल्ट्रा व्हायलेट दिव्याचे प्रकाशात हिरवट रंगाची चकाकी दिसलेबाबत खात्री करून दिली. त्यानंतर आमचे सुचनेप्रमाणे सपोफौ/कुराडे यांनी तक्रारदार यांनी हजर केलेल्या नोटांना ॲथ्रासिन पावडर लावून पुढील सापळापुर्व कारवाईच्या अनुषंगाने तपासण्या करुन अंॅथ्रासिन लावलेले 5,000/- रूपये तक्रारदार यांचे पॅन्टचे डावे बाजुच्या खिशात ठेवले. त्यानंतर तक्रारदार कुंभार, दोन्ही पंच व सापळा पथकास सापळा कारवाईचे अनुषंगाने सुचना दिल्या. तसेच तक्रारदार कुंभार यांना तलाठी कार्यालय, षिंगणापूर येथील तलाठी सनदी यांनी लाचेची रक्कम स्विकारलेनंतर त्यांनी त्यांचे तोंडावरील रुमाल काढून पुर्वनियोजीत इशारा करणेचा आहे असे सांगितले.त्यानंतर शासकीय डिजीटल व्हाॅईस रेकाॅर्डर काढून त्यामध्ये नवीन ज़क्ड कंपनीचे 8 जीबीचे मायक्रो एसडीएचसी कार्ड (मेमरी कार्ड) पंचाचे समक्ष घालून,रेकाॅर्डरचे फोल्डर मध्ये यापुर्वीचे कोणतेही ध्वनिमुद्रीत संभाषण नसलेची तक्रारदार कुंभार व पंचाची खात्री करून दिली. डिजीटल व्हाॅईस रेकाॅर्डर चालू बंद करण्याचे प्रात्यक्षीक दाखविले. त्यानंतर सापळा कारवाईचे अनुषंगाने तक्रारदार कुंभार व दोन्ही पंचाची निवेदने घेतली. त्यानंतर सापळा कारवाईवेळी आलोसे यांना ताब्यात घेताना पोकाॅ/कृष्णा पाटील यांना त्यांच्याकडील मोबाईल फोनमध्ये व्हिडीओ शुटिंग करण्याच्या सुचना दिल्या. त्यानंतर व्हाईस रेकाॅर्डर 13.07 वाजता सुरू करून, तो तक्रारदार कुंभार यांचे शर्टचे आतमध्ये लाल-काळया दो-याचे साहयाने गळयात अडकवला. त्यानंतर तक्रारदार कुंभार व पंच नं.1 सत्यजीत मंडले असे त्यांचे मोपेड मोटर सायकलने आम्ही थांबलेल्या ठिकाणाहुन श्री बटुकेष्वर गणेष मंदीर पासुन तलाठी कार्यालय षिंगणापूरकडे निघाले. त्यावेळी त्यांचे पाठोपाठ मी, सापळा पथक, पंच नं.2 हर्षल धुमाळ असे आमचेकडील चारचाकी वाहनातुन तक्रारदार यांचे पाठोपाठ तलाठी कार्यालय षिंगणापूर जवळ आलो. त्यावेळी तक्रारदार कुंभार व पंच नं.1 सत्यजीत मंडले असे तलाठी कार्यालय षिंगणापूर कार्यालयात गेले. आम्ही तलाठी कार्यालय षिंगणापूर येथे आजुबाजुला सापळा लावुन थांबलो. तक्रारदार कुंभार यांनी तलाठी कार्यालय,षिंगणापूर येथील तलाठी ईरफान सनदी यांचे कार्यालयातून बाहेर पडत असलेले दिपक कांबळे यांनी पैसे स्विकारलेबाबतचा तोंडावरील हातरुमाल काढून लाच रक्कम स्विकलेबाबत पुर्वनियोजीत इशारा केला असता मी, पंच नं.02 हर्षल धुमाळ व स्टाफ तेथे गेलो. तक्रारदार कुंभार यांचेकडील व्हाईस रेकाॅर्डर 13.56 वाजता बंद करून, तात्काळ लाच स्विकारलेल्या दिपक कांबळे व तलाठी सनदी यांना ताब्यात घेतले.

त्यावेळी आम्ही तक्रारदार व पंच नं.01मंडले यांना सापळा कारवाईवेळी काय हकीकत घडली असे विचारले असता, त्यांनी सांगितले की, तक्रारदार कुंभार यांचे तलाठी सनदी व तलाठी कार्यालय येथे काम करणारे दिपक कांबळे यांचे मध्ये कुंभार यांचे कामाचे अनुषंगाने बोलले झाले त्यावेळी तक्रारदार हे ''काय काय ते काल साहेबांना भेटलेलो काल''असे म्हणाले त्यावर दिपक कांबळे,'बर'असे म्हणाले त्यावर तक्रारदार कुंभार यांनी 'आॅफिसला या म्हणून सांगितलेलं काल

साहेब भेटलेलं कोल्हापूरात"असे बोलले त्यावर दिपक कांबळे,'बर सगळयाना सांगत कशाला सुटलाईस'असे म्हणाले त्यावर तक्रारदार कुंभार''हं तेन्ही घेतलं ना, तेन्ही घेणार होतेत, ते घेणार म्हणून सांगितलेलं"असे म्हणाले त्यावर दिपक कांबळे 'काय मर्दा साहेबांना विचारलं आता'असे म्हणाले त्यावर तक्रारदार कुंभार 'बर काय म्हटले' असे विचारले त्यावर दिपक कांबळे,'तुझं सांगितलेलं साहेबांना सांगितलं'असे म्हणाले त्यावर,तक्रारदार कुंभार'बर काय म्हणाले'असे विचारले त्यावर दिपक कांबळे काल .... कालचा विषय सांगितला त्यांना, त्यांना वाटलं तू दयायला आलाईस, अस वाटलं "असे म्हणाले त्यावर तक्रारदार कुंभार,मला वाटलं बोलवलं आणि म्हटलं काय काम हाय, साहेब म्हटलं येवून भेटा आॅफिसला म्हणून सांगितलेलं असे म्हणाले त्यावर दिपक कांबळे तू ू देणार नसला तरी पण सांग,असे बोलले त्यावर तक्रारदार कुंभार ,'काय ते मी देणार की,तुम्ही सांगितलेलं देवू या की, असे म्हणाले त्यावर दिपक कांबळे,'हा मग' असे विचारले त्यावर तक्रारदार कुंभार,'7/12 च काम कधी होणार हे विचारायचं होतं'असे बोलून तक्रारदार व दिपक कांबळे यांचेमध्ये तक्रारदार यांचे कामचे अनुषंगाने बोलणे होवून दिपक कांबळे, आणलेत का आता 'असे विचारले त्यावर तक्रारदार कुंभार,'देवू या की, साहेबांना आणि एकदा विचारून फायनल' असे बोलले. त्यानंतर तक्रारदार हे तलाठी सनदी यांना भेटण्यासाठी आतमध्ये गेले त्यावेळी तक्रारदार व तलाठी सनदी यांचेमध्ये कामाचे अनुषंगाने बोलणे झाले. त्यावेळी तक्रारदार कुंभार यांनी ''करताय का फास्ट, तुम्ही सांगितलेले देवू यांचेकडे का." असे म्हणाले, त्यावेळी तलाठी ईरफान सनदी यांनी ''हु'' असे बोलले त्यानंतर तक्रारदार हे तलाठी ईरफान सनदी यांचे सांगणेप्रमाणे दिपक कांबळे यांना तलाठी कार्यालयाचे बाजूस असले रुममध्ये येवून भेटले, त्यावेळी तक्रारदार कुंभार हे साहेब बोललो साहेबांषी फक्त रिक्वेस्ट करुन सांगा की, जरा फास्ट करायला अर्जंट हाय मला जरा बॅकेत दयायला" असे बोलले त्यावेळी दिपक कांबळे हे''आता आणलय का नाही" असे विचारले त्यावर तक्रारदार कुंभार हे ''हो आणलं"असे बोलले त्यावर दिपक कांबळे,'मग दे की लागलीचं'असे बोलून त्यांनी तक्रारदार यांना''ठेव बाब हित" असे बोलून त्यांनी त्या खोलीतील त्यांचे समोरील टेबलचा ड्रा ॅव्हर उघडून तक्रारदार यांना त्यामध्ये 5,000/- रुपये ठेवण्यास सांगितले, त्याप्रमाणे तक्रारदार यांनी टेबलाचे डावे बाजूस असले ड्राॅव्हरमध्ये 5,000/- रुपये लाच रक्कम ठेवली. त्यावेळी तक्रारदार यांनी दिपक कांबळे यांनी लाच रक्कम स्विकारलेनंतरचा पुर्वनियोजीत इशारा केला.

त्यानंतर आम्ही पंच नं.2 हर्षल धुमाळ व सापळा पथकासह तलाठी कार्यालयात जावून पंचासमक्ष आलोसे ईरफान सनदी यांना ताब्यात घेवून त्यांचे नाव, पद विचारता त्यांनी त्यांचे नाव ईरफान दिलावर सनदी, वय-41 वर्षे, पद- ग्राममहसुल अधिकारी, सजा षिंगणापुर रा.860/2, षिवाजी का ॅलनी, लाईन बाजार, कसबा बावडा कोल्हापूर ता.करवीर जि.कोल्हापूर तसेच तलाठी कार्यालयातील दिपक कांबळे यांना ताब्यात घेतले, त्यावेळी दिपक कांबळे यांना आम्ही त्यांचे नाव, पद व पत्ता विचारला असता त्यांनी त्यांचे नाव दिपक सदाषिव कांबळे वय.43 पद- ग्रामपंचायत सदस्य, ग्रामपंचायत षिंगणापुर, रा. डाॅ.बाबासाहेब आंबेडकर चैक,बौध्द विहार जवळ, षिंगणापूर असल्याचे सांगितले. त्यावेळी पंच नं.1 यांच्याकडे लाच रक्कम कोठे आहे. याबबत विचारणा करता त्यांनी दिपक कांबळे यांचे सांगणे प्रमाणे तक्रारदार कुंभार यांनी तलाठी कार्यालयाचे बाजूस असले खोलीमध्ये असले टेबलकडे बोट करुन त्या टेबलमधील डाव्या बाजुचे ड्राॅव्हरमध्ये ठेवली असल्याचे सांगितले. त्यावेळी पंच नं.2 हर्षल धुमाळ यांना सदरची लाच रक्कम ताब्यात घेण्यास सांगून

सापळापुर्व पंचनाम्यावेळी कागदावर नमुद केलेल्या नोटांच्या नंबरची यादी प्रमाणे पडताळणी केली असता बरोबर मिळून आल्याने त्यावेळी कारवाईचे अनुषंगाने आवष्यक त्या सर्व तपासण्या करुन नोटा ठेवलेल्या ड्राॅव्हरचे आतील बाजूस लागलेली ॲथ्रासिन पावडर पंचा समक्ष पोकाॅ/संदीप पवार यांचेकरवी एका कापसाचे बोळयाने पुसून घेवून सदर बोळा एका पारदर्षक प्लॅस्टिकचे पाऊचमध्ये ठेवला. त्यानंतर तलाठी सनदी यांचेकडून तक्रारदार कुंभार यांनी त्यांचे वडिलांचे नांवे असलेल्या प्लाॅटचे 7/12 पत्रकी नाव नोंद होणेकरीता दिलेला अर्ज व त्यासोबतची कागदपत्रे तलाठी सनदी यांचेकडून ताब्यात घेतली. त्यानंतर झाले कारवाईची पुढील सर्व कार्यवाही करवीर पोलीस ठाणे येथे पुर्ण करण्यात आली आहे.

तरी यातील मुळ तक्रारदार योगेश रघुनाथ कुभांर यांनी मौजे शिंगणापूर, ता.करवीर येथील गट नंबर 73/48/प्लाॅट नं./ए/12 व गट नंबर 73/48/प्लाॅट नं./ए/11 मधील एकुण 230.10 चै.मी.क्षेत्राचा खुला प्लाॅट आणि या प्लाॅट वरील बांधण्यात आलेल्या रो बंगला राजेश पांडुरंग कुंभार,रा. ई वार्ड कोल्हापूर यांच्याकडुन दिनांक 22/04/2024 रोजी खरेदी केलेला होता. सदर गट नंबर 73/48/प्लाॅट नं./ए/12 व गट नंबर 73/48/प्लाॅट नं./ए/11 मधील सातबारा पत्रकी राजेश पांडुरंग कुंभार यांचे नाव कमी करून वडील रघुनाथ बंडु कंुभार यांचे नाव नोंद करणेसाठी तलाठी ईरफान दिलावर सनदी यांनी 10,000/- रुपये दयावे लागतील असे म्हणुन स्वतःसाठी केली व तलाठी कार्यालय येथे काम करणारे दिपक कांबळे यांचे करवी तक्रारदार कुंभार यांचेकडे बेकायदेशिर व अप्रमाणिकपणे 10,000/- रूपये लाचेची मागणी करून तडजोडीअंती 5,000/- रूपये लाचेची मागणी करुन सदर लाच रक्कम तक्रारदार कुंभार यांचेकडुन दिपक कांबळे यांनी तलाठी ईरफान सनदी यांचे सांगणे प्रमाणे बेकायदेशिरपणे व अप्रामाणिकपणे स्विकारताना त्यांना आम्ही तसेच सापळा पथकाने रंगेहाथ पकडले आहे म्हणुन माझी आरोपी लोकसेवक ईरफान दिलावर सनदी, वय-41 वर्षे; पद-ग्राममहसुल अधिकारी, सजा षिंगणापुर, रा.860/2, षिवाजी काॅलनी, लाईन बाजार, कसबा बावडा, कोल्हापूर, ता.करवीर, जि.कोल्हापूर व इतर लोकसेवक दिपक सदाषिव कांबळे, वय.43 वर्षे, पद-ग्रामपंचायत सदस्य, ग्रामपंचायत षिंगणापुर, ता.करवीर, जि.कोल्हापूर रा.डाॅ.बाबासाहेब आंबेडकर चैक, बौध्द विहार जवळ, षिंगणापूर यांचेविरूध्द माझी फिर्याद आहे.

माझा वरील वर्दीजबाब मी सांगितले प्रमाणे संगणकावर टंकलिखित केलेला असून, तो मी वाचून पाहिला असता बरोबर आहे.

समक्ष हा दिला जबाब स. ता. म.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.**
(केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध दिसून आल्यामुळे):

(1) **Registered the case and took up the investigation (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):** Kishor Sadashiv Shinde (पोलीस निरीक्षक) **or (किंवा):**

(2) Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव): Rank (हुद्दा):

No. (क्र.): to take up the Investigation (तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)

(3) Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

or (किंवा)

(4) Transferred to P.S. (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

District (जिल्हा): on point of jurisdiction (अधिकाराच्या दृष्टिकोनातून).

F.I.R. read over to the complainant / informant, admitted to be correctly recorded and a copy given to the complainant /informant, free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली)

R.O.A.C. (आर.ओ.ए.सी.)

ठाणे अंमलदार
करवीर पोलीस ठाणे, कोल्हापूर

Signature of Officer in charge, Police Station (ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

Name (नाव): Kishor Sadashiv Shinde

Rank (हुद्दा): I (Inspector)

No. (क्र.): KSSM7601

14. Signature / Thumb impression of the complainant / informant (तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा)

15. Date and time of dispatch to the court (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):